तरुण भारत
शनिवार, १४ मार्च २०१५

# दोडामार्ग महाविद्यालयात २६, २७ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र

वार्ताहर
दोडामार्ग

येथील नवनिर्माण शिक्षण संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद, मुंबईने २६ व २७ मार्च रोजी पश्चिम घाट – जागतिक वारसा, पर्यावरण आणि विकास या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

पश्चिम घाटासंदर्भात माधव गाडगीळ समिती व कस्तुरीरंगन समिती यांच्या बहुचर्चित अहवालावरही तज्ज्ञ मते मांडणार आहेत. पालघर कॉलेजचे प्राचार्य डॉ. हेमंत पेडणेकर, डॉ. अंबादास जाधव, डॉ. नंदकुमार सावंत, डॉ. प्रवीणकुमार रथ, डॉ. अभय पाटील, डॉ. एच. बी. राठोड, डॉ. मीना पोद्दार, डॉ. सोनलकुमार, डॉ. ओमप्रकाश शहापूरकर यांचे मार्गदर्शन होणार आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ, पश्चिम बंगालबरोबरच देशाच्या अन्य राज्यांतील १०० पेक्षा अधिक पर्यावरण अभ्यासक यामध्ये सहभागी होणार आहेत.

**देशातील १०० हून अधिक पर्यावरण तज्ज्ञ सहभागी होणार**

चर्चासत्राचा प्रारंभ २६ रोजी सकाळी १० वा. होणार असून उद्घाटनासाठी गोव्याचे मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांना निमंत्रित केले आहे. २७ रोजीच्या समारोप समारंभास पर्यावरण चळवळीतील अग्रणी प्राचार्य डॉ. एम. आय. बाचूळकर उपस्थित राहणार आहेत.